# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २५/०७/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### खून

**पो.स्टे. उमरेड :–** अंतर्गत मौजा ईतवारीपेठ उमरेड येथे दिनांक २३/०७/२०२२ चे १५.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान शुभम भोजराज दमडु(मृतक), वय २५ वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड ता.उमरेड जि. नागपूर व आरोपी क्र. १) रोशन सदाशिव कारगावकर वय २९ वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड व २) बाल्या उर्फ बादल मोरेश्वर लेंडे वय २४ वर्ष, रा. आमगाव देवळी त. उमरेड हे एकाच मोहल्यातील राहणारे असुन शुभम हा दिनांक २३/०७/२०२२ चे १५:०० वा. पासुन घरी आला नव्हता. त्याचा फोन सुध्दा लागत नसल्याने फिर्यादी नामे– हरिश चिंधुजी दमडु वय ३२ वर्ष रा.वाघमारे लेआउट परसोडी उमरेड ता.उमरेड जि.नागपूर व त्याचे नातेवाईकाने त्याचा शोध घेत असता त्याचे प्रेत हे आरोपीतांचे घरात मिळुन आले. मृतकाचे पोटावर व गळयावर चाकुचे वार असुन मृतकाचा खून हा आरोपीने मृतकाचे अंगावरील सोन्याच्या अंगठया लुटन्याच्या उद्देशाने व इतर ही कोणत्यातरी कारणाने केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे मो क्र. ९९२३३७४२९० हे करीत आहे.

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. बुटीबोरी :–** अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील हनुमान नगर वार्ड क्र.४ ता.जि.नागपुर येथे दिनांक २३/०७/२०२२ चे २१.०० वा. ते २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. आशा कोमलचंद पाली वय ४५ वर्ष रा. वार्ड न.४ हनुमान नगर, ता जि.नागपुर ग्रा. व्यवसाय – जनावरे चारणे व जखमी फिर्यादीचे पती– कोमलचंद देविदयाल पाली वय ५२ वर्ष रा. वार्ड न.४ हनुमान नगर, ता जि.नागपुर हे दि. २३/०७/२२ चे २१.०० वा. सुमारास घरी जेवण करित असतांना फिर्यादीचे पती दारू पिवुन असल्याने फिर्यादी सोबत 'तु फक्त तुझेच नातेवाईकाशी फोनवर बोलते, माझे नातेवाईकाशी बोलत नाही' असे बोलुन वाद करून तिला शिविगाळ करून मारपीट करीत असल्याने फिर्यादीचा मुलगा आरोपी नामे– जितु कोमलचंद पाली वय १९ वर्ष व्यवसाय – मिस्त्रीकाम हा झोपेतुन उठुन फिर्यादीचे पतीला 'आईला कशाला मारता' असे बोलुन हटकल्याने त्यांनी आरोपीस 'तु आमचे मधात बोलु नकोस' असे म्हणुन शिविगाळ करू लागला. यानंतर फिर्यादीचा मुलगा आरोपीने घरात ठेवुन असलेली कुऱ्हाडीने कोमलचंद देविदयाल पाली याच्या डोक्यावर कुऱ्हाडीचे मागील मुदंयाकडील भागाने दोन वेळा मारून गंभीर जखमी करून ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री राकेश साखरकर मो क्र ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील गाडेघाट शिवार राणीबाग जवळ येथे दि. २३/०७/२२ चे १७.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान आरोपी क्र. १. विक्रम तिवाडे, २. शैलेश आसोले व ३. आकाश भगत तिन्ही रा. कन्हान यांनी संगनमत करुन डब्लु.सी.एल. ईंदर कॉलरी येथुन डब्लु.सी.एल. चा ४८०० किलो इतका कोळसा किंमती १९,२००/—रु. चा मुद्देमाल चोरुन गाडेघाट शिवार राणीबाग जवळ जाडीझुडपात साठा करुन ठेवलेला पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रविकांत रामदास कन्डे( डब्लु.सी.एल. ईंदर कॉलरी सुरक्षा इंचार्ज), वय ४४ वर्ष, रा. चनकापुर कॉलनी क्वा.नं. २६/१ खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक प्रशांत रंगारी मो. नं. ८६००८३४०४७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— दि. २३/०७/२२ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान इंदिरा नगर कन्हान सार्वजनीक हनुमान मंदीर समिती, कन्हान येथील शेन्डे हे पुजा करण्याकरिता गेले असता त्यांनी फोन करून सांगितले की, ‘आपल्या खुल्या हनुमान मंदीरातील दोन पितळी घंटया अंदाजे ३ किलो कि. २,०००/—रू. व दान पेटी ची कि ५,०००/—रू. असा एकुण कि. ७,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नारद गोपीचंद दाराडे, वय ५७ वर्ष, रा. इंदिरा नगर कन्हान सार्वजनीक हनुमान मंदीर समिती कन्हान यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— दि. २२/०७/२२ चे १८.०० वा. ते दि. २३/०७/२२ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मेघराज भैयालाल खरपूरीया, वय ४२ वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड याने शेतात पाणी ओलण्याकरीता विहीरीवर मोटार पंप बसवीला आहे. फिर्यादि हे दि. २२/०७/२२ रोजी शेतात काम करुन सायंकाळी १८.०० वा. दरम्यान घरी परत आले. तेव्हा त्यांच्या शेतातील दोन्ही विहीरीवर मोटाराला लावलेला केबल वायर होता दुस—या दिवशी दि.२३/०७/२२ चे ०८.३० वा. दर शेतात गेले असता दोन्ही विहिरीवरील केबल वायर अंदाजे १७५ फुट किंमत १,७५०/—रु. असे दिसुन आले नाही. तसेच फिर्यादिच्या शेतात झालेल्या केबल वायर चोरी प्रमाणे शेत शेजारी ०१. अर्जुन मुरोडीया यांचे शेतातुन २९० फुट केबल वायर अंदाजे कि. २,९००/—रु., ०२. विलास मुरोडीया यांचे शेतातुन ६० फुट केबल वायर कि. ६००/—रु., ३. रामकिसन मुरोडीया यांच्या शेतातुन १५० फुट केबल वायर कि. १,५००/—रु., ४. रवींद्र काकडे यांचे शेतातुन ५० फुट केबल वायर कि. ५००/—रु., ५. रामचंद्र मुरोडीया यांचे शेतातुन १५० फुट केबल वायर कि. १,५००/—रु. ६. यंशवंत खरपुरीया यांचे शेतातुन ७० फुट केबल वायर कि. ७,००/—रु., ७. नारायन खरपुरीया यांचे शेतातुन ६० फुट केबल वायर कि. ६००/—रु., ८. रमेश मुदांफळे यांचे शेतातुन ५० फुट केबल वायर कि. ५,००/—रु., ९. कमलसिंग कुमेरीया यांचे शेतातुन ४० फुट केबल वायर कि. ४,००/—रु. माल असा एकुण १०९५ फुट केबल वायर एकुण १०,९५०/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक तायडे हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत मौजा बाजारगाव येथे दि. २३/०७/२२ चे २०.३० वा. ते २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— हंसराज राधेश्याम मोर्य, वय ५६ वर्ष, रा. १७३ एफ न्युकोटगाव ता.जि. गाजीयाबाद ह.मु. गावंडे कॉम्पलेक्स बाजारगाव ता.जि. नागपुर हे रामसन्स कंपनी बाजारगाव येथे डयुटी करून दिनांक २३/७/२२ चे रात्री २०.३० वा. जेवन करण्याकरीता घरीरूम वर आले व २१.३० वा. परत डयुटी वर जाण्याकरीता गाडी जवळ गेले असता त्यांची गाडी दिसली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची एमएच— ४०/बिडी— ५०२२ क्रमांकाची मोटरसायकल किंमती २०,०००/—रू. ची चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल बनसोड मो.क्र. ९७६४९०२०८ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर :—** दिनांक २६/११/२०२१ चे २२.०० वा. चे सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन पीडित मुलगी वय १७ वर्ष ही रात्री ११.०० वा. कोणाला काही न सांगता घरातुन निघुन गेली. तिचा नातेवाईकांकडे व शेजारी यांचेकडे चौकशी केली असता ती मिळुन आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

फिर्यादीचे तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरूध्द पोस्टे. कळमेश्वर येथे दि. २७/११/२०२१ रोजी अप क्रं ६६५/२०२१ कलम ३६३ भा द वी अन्वये गुन्हा नोंद केला होता. पीडिता हि परत आल्यानंतर तिच्या बयानावरून दिनांक २१/०७/२०२२ चे २२.३१ वा. सदर गुन्हयात कलम ३७६(२)एन, ३७६(जे) भादवी सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे कलम वाढ करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी नामे— जयवंता सुरेश टेकाडे, वय २६ वर्ष, रा. घोराड ता. कळमेश्वर, जि. नागपूर याच्या विरुध्द कलम ३६३ भादवी तसेच कलम ३७६(२)एन, ३७६(जे) भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी प्रियंका गेडाम मो.क्र. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**